
20 Rs.




No. 90420 Date 14 FEB 1992

Price Rs. 20

Through T. D. LIMAYE
STAMP VENDOR PUNE-2.

- विना मोबदला दुरुस्तीपत्र -

[पुरवणी दस्तऐवज]

दुरुस्तीपत्र [गाडेपट्टा] आज वार मंगळवार दिनांक १८ माहे फेब्रुवारी सन १९९२ इसवी रोजी लिहून :-

| | |
|---|---|
| पुणे महानगरपालिके तर्फे<br>महापालिका सहायक आयुक्त [विशेष]<br>श्री. वसंत व्ही. पोरेड्डीकर,<br>वय वर्षे अं. ४१, धंदा - नोकरी<br>राहणार - पुणे महानगरपालिका भवन<br>पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे- ५ | लिहून घेणार |

यांसी..

| | |
|---|---|
| श्री. बन्सीलाल रामनाथ अगरवाल चॅरिटेबल ट्रस्ट<br>२५१ बुधवार पेठ, श्रीमंगल सिटी पोस्ट चौक,<br>बँक ऑफ इंडिया समोर, पुणे ४११ ००२ | लिहून देणार |

तर्फे ट्रस्टी

श्री. राजकुमार बन्सीलाल आगरवाल
वय वर्षे अं. ३३, धंदा- व्यापार,
राहणार- २८३ बुधवार पेठ,,
पुणे - ४११ ००२.
} लिहून देणार

कारणे दुरुस्तीपत्र लिहून देतो ऐसा जे -

१] मिळकतीचे वर्णन :- तुकडी पुणे पोट तुकडी तालुका हवेली पुणे शहर, सब रजिस्ट्रार व पुणे महानगरपालिकेच्या हद्दीतील पुणे पेठ भिववेवाडी पुर्नवसन योजनेतील सर्व्हे क्रमांक ६४६, ६४७ व ६६६ पैकी विकास आराखड्यात अनुक्रमे शाळा, क्रिडांगण व आरोग्य केंद्रासाठी राखुन ठेवलेल्या सुमारे २.६०१ हेक्टर जागा यांसी चतु:सीमा :-

पूर्वेस - १० मीटरचा रस्ता व ई.डब्ल्यू. एस मधील चाळ क्र. ४/८१

पश्चिमेस - १० मीटरचा रस्ता

उत्तरेस - १० मीटरचा रस्ता.

दक्षिणेस - ई. डब्ल्यू एस पैकी जागा व चाळी

येणेप्रमाणे चतु:सीमेमधील २.६०१ हेक्टर जागा.

२] वर कलम [१] मध्ये वर्णन केलेली जागा ९९ वर्षे दीर्घ मुदतीचा भाडेपट्टा, करारनामा लिहून देणार यांनी लिहून घेणार यांसी लिहून दिलेला आहे. व तो मा. सब रजिस्ट्रार साहेब हवेली क्र. १ यांचेकडे दस्तऐवज क्रमांक ८२५९/९१ दिनांक १५/६/९१ ने रितसर रजिस्टर करण्यात आलेला आहे.

३] वर कलम [१] मध्ये वर्णन केलेल्या माध्यमिक शाळेसाठी १.६११ हेक्टर, क्रिडांगणासाठी ०.४० हेक्टर व आरोग्य केंद्रासाठी ०.५९ हेक्टर जागा असा मान्य ले-आऊटमध्ये राखीव असलेला प्लॉट देण्याविषयी संमत केलेल्या ठरावानुसार म्हणजे मा. मुख्य सभा ठराव क्र. ६६३ दिनांक १९-२-८५, मा. मुख्य सभा ठराव क्र. ६६४, दि. १९-२-८५ व मा. मुख्य सभा ठराव क्र. ६१ दि. २०-६-८५ अन्वये प्रिमियमची सर्व रक्कम घेऊन ९९ वर्षे मुदतीच्या दीर्घ मुदतीच्या भाडेपट्टयाने देण्यात आलेली आहे.

सदर कामी करारनामा रजिस्टर्ड झालेनंतर लिहून देणार यांनी दिनांक १६-७-९१ चे अर्जान्वये या जागेचा जास्तीत जास्त उपयोग करुन घेण्याचे उद्देशाने या जागेत शाळेव्यतिरिक्त अभियांत्रिकी महाविद्यालय, एम.बी.ए. कोर्स व इतर योग्य असा शैक्षणिक योजना पुणे महानगरपालिकेने ठरवून दिलेल्या उद्देशानुसार शाळा, आरोग्य केंद्र व क्रिडांगण यांना कोणत्याही प्रकारे जागा कमी पडणार नाही याची खात्री करुन सुरु करता येईल म्हणून या जागेत शाळा, आरोग्य केंद्र व क्रिडांगणा व्यतिरिक्त अभियांत्रिकी महाविद्यालय, एम.बी.ए. कोर्स व इतर शैक्षणिक योजना, राबविणेसाठी परवानगी अर्ज केला आहे. शैक्षणिक योजना/ उपक्रम या संबंधी खात्याच्या / शासनाच्या मान्यतेनेच सुरु करण्यात येतील असे कळविले आहे.

४] लिहून देणार यांचे दिनांक १६/७/९१ चे अर्जावरुन शासकिय कामकाज चालविण्यात येऊन लिहून घेणार यांचेकडील या मुख्य सभा ठराव क्र. ६६३ दिनांक १९/२/१९८५ मधील शाळेसाठी मान्य झालेल्या १.६११ हेक्टर जागे बाबत झालेल्या ठरावातील अट क्र. २ मध्ये दुरुस्ती करणे आवश्यक झाल्याने मा. स्थायी समिती ठराव क्र. १४५७ दिनांक २७/११/९१ व मा. मुख्यसभा ठराव क्रमांक २७३ दिनांक २३/१२/९१ ने सर्व साधारण सभा ठराव क्र. ६६३ दिनांक १९/२/८५ ने मान्य केलेल्या अट क्र. २ मध्ये दुरुस्ती करणेस व त्याप्रमाणे संस्थेबरोबर रजिस्टर्ड झालेल्या करारनाम्या मध्ये करारनामा दुरुस्ती व तदनुषंगिक खर्च लिहून देणार यांनी करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

त्यानुसार सदरचे दुरुस्तीपत्र करण्यात येत आहे.

५] लिहून घेणार व लिहून देणार यांचे दरम्यान दिनांक १५/६/१९९१ रोजी रजिस्टर्ड करण्यात आलेल्या करारनाम्यातील अट क्र. २ मध्ये पुढील प्रमाणे दुरुस्ती करण्यात येत आहे.

अट क्र. २ "वर परिच्छेद क्र. [४] मध्ये नमूद केलेली जागा लिहून देणार यांना शाळा, इंजिनियरिंग व आरोग्य केंद्र या कारणासाठी प्रिमियमच्या तत्त्वावर भाडयाने देण्यात आलेली असल्याने त्या त्या कारणासाठीच अगर तदनुषंगिक कामासाठीच बंधनकारक राहील अन्य इतर कोणत्याही कारणासाठी जागेचा वापर लिहून देणार यांच्या करता येणार नाही. शाळेसाठी [१.६११ हेक्टर जागा] दिलेली जागा शाळे व्यतिरिक्त अभियांत्रिकी महाविद्यालय एम.बी.ए कोर्स व इतर शैक्षणिक योजना राबविणे कामी जागेचा लिहून देणार त्याच कामी अगर तदनुषंगिक कामाकरिताच वापर करता येईल या शिवाय इतर कारणाकरिता जागेचा उपयोग ट्रस्टला करता येणार नाही."

६] वर कलम [५] मध्ये नमूद केल्याप्रमाणे मूळ करारनाम्यातील अट क्र. २ आज दिनांक १८/५/९२ रोजीचे दुरुस्तीपत्रकान्वये दुरुस्ती करण्यात येत आहे. या दुरुस्ती करीता लिहून घेणार व लिहून देणार यांनी एकमेकास कोणत्याही प्रकारचा आर्थिक वा अन्य कोणत्याही स्वरूपाचा मोबदला दिलेला नाही वा घेतलेला नाही. सबब येथून मूळ भाडेपट्टा करारातील या दुरुस्तीपत्रका-खेरीज सर्व अटी, शर्ती व मजकूर कायम असून त्या लिहून देणार यांचे-वर बंधनकारक आहेत. वर दुरुस्ती केल्या प्रमाणे मूळ दस्त हा दुरुस्ती सह यापुढे वाचण्यात यावा.

(३१)

७] या दुरूस्तीपत्रकाकरीता आलेला स्टँप, रजिस्ट्रेशन इत्यादी प्रकारचा सर्व खर्च लिहून देणार यांनी केलेला आहे.

८] हे दुरूस्तीपत्र लिहून घेण्याचा आपला अधिकार मा. महापालिका आयुक्त पुणे महानगर पालिका, पुणे यांनी या महापालिका सहाय्यक आयुक्त [विशेष] यांना ठरावक्रमांक एम.सी/डीइएल/१/१०८० दिनांक १६/७/८७ ने सुपुर्द केलेला आहे.

येणेप्रमाणे या गोष्टीचे साक्षीकरीता आपण दोघांनीही आपल्या दोघांच्या सह्या आज दिनांक १८/२/ १९९२ रोजी पुणे मुक्कामी केलेल्या आहेत.

साक्षीदारांच्या सह्या

१] सही - [signature]
नाव मनोहर दिगंबर कुलकर्णी
पत्ता श्रीप्रसाद
३/नाना गार्डन बावधी
तळेगांव दाभाडे ४१०५०७

२] सही - [signature]
नाव (वि. व. लोकरे मेटेनन्स सेवक)
पत्ता- भूमी आणि जिंदगी विभाग
पुणे महानगर पालिका
शिवाजीनगर पुणे ५

[signature]
लिहून देणार
(सुनीलकुमार व्ह. आगाशे)

लिहून घेणार [signature] १८-२-९२
महापालिका सहा. आयुक्त [विशेष]
पुणे महानगरपालिका.

[signature] 18/2/92
सहाय्यक अभियंता
भूमि आणि जिंदगी विभाग,
पुणे महानगरपालिका.

दस्त क्रमांक ...४०१...
सन १९९२ ...... ह. हवेली ...
...१८... दिनांक ...२... ४. २
वाशी निबंधनाबाबत की पुरस्का

| | रु. पै. |
|---|---|
| नोंदणी फी | २०=०० |
| नक्कल फी | १=०० |
| | १=०० |
| | १=०० |
| एकूण | २३=०० |

सह. दुय्यम निबंधक, हवेली नं. १

सह. दुय्यम निबंधक, हवेली नं. १

श्री बन्सीलाल रामनाथ अगरवाल चॅरीटेबल ट्रस्ट तर्फे विश्वस्त म्हणून श्री. राजकुमार बन्सीलाल अगरवाल, ३३, व्यापार, रा. २८३ बुधवार पेठ, पुणे २
दस्तऐवज करून देणार
तथाकथित दुरुस्तीपत्राचा
दस्तऐवज करून दिल्याचे
कबूल करतात.

श्री. ग. गो. इनामदार
नोकरी रा. पुणे

म. सं. पा. आयुक्त (विशेष)
वसंत श्री. पोरडीवार

(ग. गो. इनामदार)
Sr. Clerk
भूमि आर्ज जिंदगी विभाग
पुणे महानगरपालिका

...१९०८ चे कलम ८८ प्रमाणे ... दुय्यम निबंधकांच्या ... आहे.

मी नक्कल केली
सह दु. नि. हवेली वाचली
मी तपासली
मी रुजवात घेतली
अस्सलबरहुकूम नक्कल

पुस्तक क्र. १ चे
पान क्र. ४९० वर पुढे ५६ ते ५८
पर्यंत ४६९ क्रमांकी नोंदला

सह. दुय्यम निबंधक हवेली १
सह. दुय्यम निबंधक, हवेली नं. १

दिनांक १८ | २ | १९९२

१८।२।९२

(२०रु) (Rs.20) INDIA
बीस रुपये TWENTY RUPEES

सह दुय्यम निबंधक (वर्ग-२) सह दुय्यम निबंधक (वर्ग-२)
हवेली-१ हवेली-१.

(अभिलेखातील प्रति वरून)

| | |
|---|---|
| मी नक्कल केली | सदर नक्कल अर्जदार |
| मी वाचली | यांस त्यांचे तारीख 23/6/2014 |
| मी रूजवात घेतली | अर्जावरून ........ |
| अस्सल बरहुकुम नक्कल | मी दिली तारीख 23/6/2014 |

सह. दुय्यम निबंधक (वर्ग-२)
हवेली क्र.-१.

THE SEAL OF THE JOINT SUB REGISTRAR
सह दुय्यम निबंधक हवेली १ यांची मोहर
सत्यमेव जयते
HAVELI-1

Attested